**नियमीत दिवाणी मुकदमा क्र.१४४/२०१७ मधील**

**निशाणी क्र.४७ वर आदेश**

**CNR-MHLA110010362018**

१. सदरचा अर्ज नि.क्र.३९ वरील प्रतिदाव्यातील वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ खालील तरतुदीनुसार प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, सदर प्रतिदावा मिळकतीच्या वाटपाकरिता दाखल केलेला असुन प्रतिदाव्यामध्ये नमूद मालमत्ता क्र.५६९ व ६०२ मधील हक्क सदर वादींनी सोडुन देत असल्यामुळे सदर मिळकती कमी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिदाव्यामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्जात नमूद केल्याप्रमाणे प्रतिदाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्याची वादीने शेवटी मागणी केलेली आहे.

२. सदर अर्जाला प्रतिदाव्यातील प्रतिवादी क्र.१/२, २, ६ व ७ यांनी म्हणणे दाखल करुन तीव्र विरोध दर्शविला आहे. सदर म्हणण्यामधील थोडक्यात कथन असे आहे की, अर्जातील मागणी योग्य व कायदेशीर नाही. त्यामुळे अर्ज नामंजूर करण्याची प्रतिवादींनी शेवटी मागणी केलेली आहे. अर्जाला ईतर प्रतिवादींनी म्हणणे न दिल्यामुळे अर्ज ईतर प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्यात आलेला आहे.

३. सदर अर्जामधील व म्हणण्यामधील कथन विचारात घेवून सदरचा अर्ज निकाली काढण्याकरिता मी खालील मुद्दे विचारात घेतले आहेत. सदर मुद्दयांना कारणासहीत निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जात नमुद प्रस्तावित दुरुस्ती ही पक्षकारांमधील वादाचे निराकरण करण्यासाठी आवश्यक आहे का ? | होकारार्थी |
| २. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>का र ण मी मां सा</u>

४. सदर प्रकरणातील पक्षकारांतर्फे विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. तसेच प्रकरणातील कागदपत्रांचे अवलोकन केले.

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u> –**

५. सदर प्रकरणातील कागदपत्रांच्या अवलोकनावरुन याठिकाणी नमूद करणे आवश्यक वाटते की, नि.क्र.३९ वरील प्रतिदावा मिळकतींची वाटणी करुन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. सदर प्रतिदाव्यास प्रतिवादींनी अद्याप कैफियत अथवा म्हणणे दाखल केलेले नाही. सदर अर्जात नमूद मिळकतीमधील हक्क सोडुन देत असल्यामुळे प्रतिदाव्यातील मालमत्ता क्र.५६९ व ६०२ या मिळकती वादी कमी करु ईच्छीत आहेत. त्यामुळे पक्षकारांमधील वादाचे स्वरुप, प्रस्तावित दुरुस्तीचे स्वरुप व नैसर्गिक न्यायाचे तत्व विचारात घेऊन माझे असे मत झाले आहे की, पक्षकारांमधील वादाचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी अर्जात नमूद प्रस्तावित

दुरुस्ती ही प्रतिदाव्यामध्ये नमूद असणे आवश्यक आहे. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ला होकारार्थी निष्कर्ष नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. २ करिता –**

६. वर नमुद चर्चेवरुन स्पष्ट होते की, सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब मी शेवटी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आ दे श**

१. नि.क्र.४७ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

३. नि.क्र.३९ वरील प्रतिदाव्यातील वादींनी अर्जात नमूद केल्याप्रमाणे मूळ प्रतिदाव्यामध्ये दुरूस्ती करुन दुरुस्त प्रतिदाव्याची प्रत पुढील तारखेपर्यंत प्रकरणात दाखल करावी.

स्वा/–
(शि. म. गौरगोंड)
सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
निलंगा.

दि. ०५.०३.२०१९.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | M.N. Yenge |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D Court (Shivkant M. Gourgond) |
| Date of Judgment/Order | : | 05.03.2019 |
| Judgment/Order signed by presiding officer | : | 05.03.2019 |
| Judgment/Order uploaded on | : | 06.03.2019 |